43

(47)

No. L-2-1/522.
Old Custom House Yard, Fort,
Bombay, 16th April 1949.

District Dy.Collector,
Bombay Suburban District.

Sub: Plot No.20 in S.S.No.XVI-Andheri Sector of Shahar.

Ref: Your office file No.L.N.D.A.1390.

~~Pleas~~ The purchaser of the above plot has fully paid the balance of purchase price in respect of the said plot.

For Collector, Bombay Sub.District.

13/4/9

Godbole

16/4

R

CHAMB

23

(28)

R.L.N.D.A. 1390

Bombay, 9 June 1944.

To Shrikrishna R. Pradhan, Esq &
Mrs Kamalabai S. Pradhan,
c/o V. V. Gupte, Esq

Subject:- Plot No. 20
S. No. XVI Andheri Sector of Shahar

Sir,

I have the honour to inform you that Govt. has accepted your offer dated the 23rd March 1944 for the purchase of the above plot at Rs. 6/14/- a sq. yd. The actual area and the total purchase price of the plot will be intimated to you shortly when the plan of the plot is prepared. In the meantime please arrange to pay into this office the sum of Rs. 1054/12/- on account of balance to make up 1/4 of the plot within one month of the date of this letter failing which you will have to pay interest at 9% to the date of payment of the amount.

Your obedient servant,

o/c UB

District Deputy Collector,
Bombay Suburban District.

24/6

Mr Apte for plans

29/6/44

J24/6

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

क्रमांक : ०१/कार्या-३ब/अे-११९५
दिनांक : १४/११/२००२.

प्रति,

नगर भूमापन अधिकारी, अंधेरी.

विषय:- जमिन : मुंबई उपनगर जिल्हा
मोजे-अंधेरी येथील न.भू.क्र.६८५, ६८५/१ ते १० बाबत..

संदर्भ :- आपले पत्र क्र.न.भू.अंधेरी/न.भू.क्र.६८५, ६८५/१ ते १०/०२
दिनांक २२/७/२००२.

आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने जमिन मंजूरीची मूळ कागदपत्रे अवलोकन करता त्यावरुन असे दिसते की,

१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. एलएनडी अे-१३९० दिनांक १/५/१९४४ पाहता प्रश्नाधीन जमिन प्र.चौ.वारास रु. ६.१४ आणे या वाढीव दराने (Enhanced rate) खरेदी किमंत आकारुन (Purchase Price) श्री.श्रीकृष्ण आर.प्रधान आणि सौ.कमलाबाई एस.प्रधान यांना देण्यात आली होती.

२) खरेदी किमंत (Purchase Price) घेऊन जमिन विक्री करण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १/५/१९४४ च्या प्रस्तावास शासनाच्या दिनांक ९/६/१९४४ च्या पत्रान्वये मंजूरी देण्यात आली होती.

३) खरेदी किमंतीने जमिन खरेदी करण्याचा देऊ केलेला देकार स्विकारण्यात आल्याबाबत उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी पत्र क्र. एलएनडी अे-१३९०/दिनांक २९/६/१९४४ अन्वये श्री.श्रीकृष्ण आर.प्रधान व सौ.कमलाबाई एस.प्रधान यांना कळविले होते.

४) उपजिल्हाधिकारी यांच्या दिनांक ६/८/१९४८ च्या पत्राने खरेदीदार यांना एकूण खरेदीची किमंत रु. ५९१९.६ आणे असल्याचे कळवून त्यापैकी खरेदीदार यांनी अगोदर भरलेले रु. १२५४.१२ आणे वगळता उर्वरित रक्कम ३ वर्षात त्रमासिक हप्त्याने विहित व्याज दराने भरण्यास कळवून दिनांक १०/९/१९४८ रोजी खरेदीदार यांना जमिनीचा ताबा देण्यात आला. ताबा पावतीमध्येही संबंधितांचा खरेदीदार (Purchaser) असा उल्लेख आहे.

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी यांनी सही केलेल्या दिनांक ९/७/१९४८ च्या नकाशावर "Plot No.२० Sold to Mr.S.R. Pradhan & Mrs. K.S.Pradhan is shown bounded red" असा उल्लेख आहे.

५) जिल्हाधिकारी ,मुंबई उपनगर जिल्हा यांच्या दिनांक १६/४/१९४९ च्या पत्रावरून खरेदीदार यांनी जमिनीची खरेदीची संपूर्ण किमंत भरल्याचे दिसते.

उपरोक्त तपशिलावरून प्रश्नाधीन जमिन श्री.श्रीकृष्ण आर.प्रधान आणि सौ.कमलाबाई एस.प्रधान यांना विक्री करण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यासाठी श्री. व सौ.प्रधान यांनी खरेदीचे पूर्ण रक्कमही भरल्याचे स्पष्ट होते. त्यावेळी मुंबई महानगर पालिका अस्तित्वात नसल्याने इमारत नकाशे मंजूर करणे व जमिनीवर करावयाच्या बांधकामानुषंगाने त्यावेळच्या नियमाप्रमाणे अटी/शर्ती लादणे इत्यादी कामे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यास्तरावर होत होती. त्यामुळे त्यावेळच्या जमिन महसूल नियम १९२१ मधील नियम ४३ नुसार जमिन बीनशेती करण्यासंदर्भात एच.एच.फॉर्म मध्ये दिनांक ६/१२/१९५० रोजी करारनामा करण्यात आला होता. तसेच कागदपत्रात उपलब्ध असलेल्या दिनांक ८/८/१९५१ रोजीच्या गांव नमुना नं. ७ च्या उताऱ्यावर कब्जेदार सदरी श्री.श्रीकृष्ण आर.प्रधान यांचे नांव दाखल आहे.

कागदपत्रांची छाननी केली असता प्रश्नाधीन जमिन भोगवटादार वर्ग-२ (Occupant Class-II) म्हणून मंजूर न होता खरेदी किमंत देऊन (वाढीव दराने) जमिन खरेदी केली गेली असे दिसत आहे. त्यामुळे सन १९६३-६४ च्या दरम्यान नगर भूमापन अभिलेख अस्तित्वात आले त्यावेळी नजर चुकीने मालमत्ता कार्डावर सत्ता प्रकार "बी-१" दाखल झाला असावा असे वाटते. सबब सदरची चूक दुरुस्त करुन सत्ता प्रकार "सी" करावयाची नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी**
**यांची सही असे.**

जिल्हाधिकारी
**मुंबई उपनगर जिल्हाकरिता**

**प्रतिलिपी :-**१) अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे माहितीसाठी रवाना.

२) उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडे त्यांचे पत्र क्र. डिएन/एलएनडी/अे/१३९०/कावि-२०३/२००३ दिनांक १४/८/२००३ च्या अनुषंगाने माहितीसाठी रवाना.

२/- त्यांच्या पत्रा सोबत प्राप्त झालेली मुळ कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्याने ती जिल्हाधिकारी कार्यालयांत ठेवून घेण्यात आली आहेत.

३) तहसिलदार अंधेरी यांजकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी**
**यांची सही असे.**

जिल्हाधिकारी
**मुंबई उपनगर जिल्हाकरिता**

Scanned by CamScanner